**<u>न्यायनिर्णय</u>**
**( <u>जाहीर दिनांक २०.१०.२०१६</u> )**

१. अर्जदार क्र. १ ते ७ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन कलम २ चे तरतुदीनुसार मयत शेख करीम शेख मलंग यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ४ आणि ६ व ७ तसेच अजुन एक मयत मुलगा नामे — अब्दुल मझहर शेख करीम हे मयत शेख करीम शेख मलंग यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यापैकी अब्दुल मझहर शेख करीम यांचा मृत्यु दि.२०.०६.२००५ रोजी झाला असुन त्यांचे वारस अर्जदार क्र.५ ही त्यांची पत्नी आहे व मयत शेख करीम यांची सुन आहे. यांचेशिवाय त्यांना इतर कोणीही वारस नाही. शेख करीम शेख मलंग यांचा मृत्यु दि.१७.०८.२००१ रोजी झाला. मयतांचे पश्चात अर्जदार क्र.१ ते ५ हे कायद्याप्रमाणे त्यांचे वारस आहेत. त्यामुळे त्यांनी वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज केला आहे.

२. अर्ज दाखल झाल्यानंतर जाहीर प्रगटन व उद्घोषना पाठविण्यात आली होती व जाहीर नोटीस 'पुण्य नगरी' या वर्तमानपत्रात दिनांक २३.०७.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती परंतु कोणीही आक्षेप नोंदविला नाही.

३. अर्जातील कथनांच्या पुष्ठयर्थ अर्जदार क्र.४ यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.९ लगत, मयत शेख करीम शेख मलंग यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत नि.११ लगत, मयत अब्दुल मझहर शेख करीम यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत नि.१२ लगत, पोलीस पाटील पिंजर यांचा दाखला नि.१३ लगत, अर्जदारांच्या आधार कार्डाच्या प्रमाणित प्रती नि.१४ ते २० लगत अभिलेखावर दाखल केले आहेत.

४. अर्जदार क्र.४ अब्दुल रहीम शेख करीम यांनी नि.९ वर शपथेवर कथन केले आहे की, मयत शेख करीम शेख मलंग यांच्या मृत्यू दिनांक १७.०८.२००१ रोजी झाला. अर्जदार क्र. १ ते ४ आणि ६ व ७ तसेच अजुन एक मयत मुलगा नामे — अब्दुल मझहर शेख करीम हे मयत शेख करीम शेख मलंग यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यापैकी अब्दुल मझहर शेख करीम यांचा मृत्यु दि.२०.०६.२००५ रोजी झाला, त्यांचा मृत्यु दाखला नि.१२ लगत दाखल आहे. त्यावर त्यांचा मृत्यु दि.२०.०६.२००५ रोजी झाल्याचे नमुद आहे. त्यांचे वारस अर्जदार क्र.५ ही त्यांची पत्नी आहे व मयत

शेख करीम यांची सुन आहे. मयत शेख करीम शेख मलंग यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत नि.११ लगत दाखल केली आहे. त्यामध्ये त्यांच्या मृत्युची तारीख १७.०८.२००१ अशी नमुद आहे. पोलीस पाटील यांनी नि.१३ लगत दिलेल्या प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये मयत शेख करीम यांना अर्जदार क्र.१ ते ७ हे वारस असल्याचे त्यांनी नमुद केले आहे. यावरुन असे दिसुन येते की, अर्जदार क्र.१ ते ७ हे मयत शेख करीम शेख मलंग यांचे कायदेशीर वारस आहेत व त्यांचेशिवाय इतर कोणीही वारस नाही. सदरचे वारस प्रमाणपत्र त्यांना सरकारी कार्यालयात व सहकारी कार्यालयामध्ये सादर करण्यासाठी आवश्यक आहे. अर्जदाराने दिलेला पुरावा आव्हानीत केलेला नाही. सदरचा पुरावा उद्घोषणा व जाहीर प्रसिध्दिपासून तसाच राहीला आणि आतापर्यंत कोणीही आक्षेप घेण्यासाठी हजर राहिलेले नाही.

५. दि बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे नियम १ चे तरतूदीनुसार न्यायालयाचे मान्यतेने मयत व्यक्तीचे कायदेशीर वारस हे सक्षमपणे प्रतिनिधीत्व करू शकतात. नियम २ चे तरतुदीनुसार न्यायालयाने वारस मृत्युपत्र व्यवस्थापक किंवा प्रशासक यांना त्यांचे हक्क मान्य करण्यासाठी, त्यांनी दाखल केलेल्या अर्जावरून जाहीर प्रगटनानंतर एक महिन्याचे आत अर्जदारांचे हक्काबाबत आक्षेप घेण्यासाठी त्यांचे आक्षेप नोंदविने गरजेचे असते. नियम ७ चा दुसरा भाग हा असे विहीत करतो की, सदरचे प्रमाणपत्र हे कोणत्याही मिळकतीवरील हक्क निश्‍चित करीत नसून ते फक्त सद्य परिस्थितीवरील कायदेशीर व्यवस्था व्यक्तीचे वारसासाठी दर्शविते. तसेच अशाप्रकारे मंजूर केलेले प्रमाणपत्र अंतिमत: हक्क निर्णत करीत नाहीत किंवा इतरांचे हक्कास इजा/हानी पोहोचवित नाहीत.

६. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार हे कोणत्याही मिळकतीसंदर्भात वारस प्रमाणपत्र मागत नाहीत. याकामी इतर कोणीही हजर राहून आक्षेप नोंदविलेला नाही. त्यामुळे अर्जदाराचा पुरावा हा तसाच राहीला.

७. वरील विश्लेषणाद्वारे मी अशा अनुमानास आलो आहे की, दिनांक १५.०७.२०१६ पासून प्रस्तुत अर्जास कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदार क्र.१ ते ७ हे शेख करीम शेख मलंग यांचे मान्यताप्राप्त वारस आहेत, म्हणून मी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करीत आहे व खालीलप्रमाणे अंतीम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अर्जदार क्र.१ अब्दुल सत्तार शेख करीम, २. अब्दुल अझहर शेख करीम, ३. अब्दुल गफ्फार शेख करीम, ४. अब्दुल रहीम शेख करीम, ५. रशिदाबी ज. अब्दुल मझहर, ६. बिल्कीसबी शेख कलीम, ७. नजमाबी ज. शेख युनूस हे मयत शेख करीम शेख मलंग यांचे बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे तरतूदीनुसार मान्यताप्राप्त वारस आहेत.

३. सदरचे प्रमाणपत्र हे कोणत्याही मिळकतीवरील हक्क निश्चित करीत नसून,ते सद्य परिस्थितीवरील कायदेशीर व्यवस्था व्यक्तीचे वारसासाठी दर्शविते.

४. वरील वारसांना विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयामध्ये सादर करण्यासाठी वारसप्रमाणपत्र देण्यात यावे व सिव्हील मॅन्युअल प्रकरण १४ मध्ये परिच्छेद ३१२ प्रमाणे मूळ वारस प्रमाणपत्रावर टीप नमूद करावी.

दिनांक २०.१०.२०१६

( परेश रा. वागडोळे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बार्शीटाकळी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. File are same word for word as per original order.

Name of Steno : Mrs. Hemlata N. Dahake, Steno

Court Name : Civil Judge (Jr.Dn.) & J.M.F.C., Barshitakli

Date : 20-10-2016
Signed by Presiding Officer : 20-10-2016

Uploaded on : 26-10-2016